रे. मु. क. ५७/२०१४
ज्ञानेश्वर अंकुश वि दोधू काळू

## निशाणी ५ वरील आदेश

१. प्रस्तुतचे दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे शिवारातील शेतजमीन गट क.४७०/२अ, क्षेत्र-१ हेक्टर- ६२, पो.ख. ०.२० आर, आकार रू.१ पैसे ७५ तसेच शेतजमीन गट क.४७०/२ब, क्षेत्र ०० हेक्टर- ६३, आकार रू.०० पैसे ७० व मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे ग्रामपंचायत हददीतिल मालमत्ता क.३०३ क्षेत्र ६०x१२ ( यानंतर वाद मिळकत असा उल्लेख ) वरील वाद मिळकती हया प्रतिवादी क.१, २ व ५ यांनी कोणासही विक्री करू नये अथवा त्रयस्थाचे हस्तांतर निर्माण करू नये असा प्रतिवादी क.१, २ व ५ विरूध्द तूर्तातूर्त मनाई हुकूम वादींनी मागितलेला आहे.

२. प्रतिवादी क.१ व २ यांनी खुलासा नि.क.२३, प्रतिवादी क.४ यांनी खुलासा नि.क.२७, प्रतिवादी क.५ यांनी खुलासा नि.क.३७, अन्वये दाखल करून दाव्यास व अर्जास विरोध दर्शविला. प्रतिवादी क.३ यांनी खुलासा नि.क.४३, यांनी दाव्यास व अर्जास खुलासा दाखल करून वादींना समर्थन केले आहे. वादीने व प्रतिवादी यांनी आपआपल्या दाव्याचे पृष्ठयर्थ कागदपत्र दाखल केले आहे. वादी व प्रतिवादी यांचे सुविदय विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले.

३. वादीचे कथन कि वादीच्या मालकिच्या व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील दावा मिळकती हया प्रतिवादी क.१, २ व ५ यांनी कोणासही विक्री करू नये

अथवा त्रयस्थाचे हस्तांतर निर्माण करू नये असा प्रतिवादी क.१, २ व ५ विरूध्द तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी वादी सदरचा दावा दाखल करीत आहे. मात्र सदरच्या अंतिम निकालास बराच कालावधी लागणार असल्याने दाव्यांच्या अंतिम निकालापर्यंत तूर्तातूर्त मनाईहुकूम मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल करीत आहे.

मौजे शेणपूर ता.साक्री. जि.धुळे शिवारातील शेतजमीन गट क. ४७०/२अ, क्षेत्र १ हेक्टर- ६२, पो.ख. ०.२० आर, आकार रू.१ पैसे ७५ तसेच शेतजमीन गट क.४७०/२ब, क्षेत्र ०० हेक्टर- ६३, आकार रू.०० पैसे ७० व मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे ग्रामपंचायत हददीतिल मालमत्ता क.३०३ क्षेत्र ६०x१२ सदर मिळकत हा दाव्याचा मुख्य विषय आहे. सबब यापुढे सदर मिळकतीचा उल्लेख ''दाव्यातील मिळकत '' असा केला आहे.

दावा मिळकती या प्रतिवादी क.१,३ व ४ चे वडिल काळू नारायण वंजारी व कै.लाला नथ्थू वंजारी यांची वडिलोपार्जित शेतमिळकत होती. सदर शेतमिळकतीत काळू नारायण वंजारी व कै.लाला नथ्थू वंजारी यांच्यात वाटणी होवून सदरची दावा मिळकत हि काळू नारायण वंजारी यांच्या वाटणीस आलेली आहे. काळू नारायण वंजारी दि.१०/३/१९७८ रोजी मयत झालेले असून सदर मूळ गट नं.४७० यास वारस म्हणून प्रतिवादी क.१,३ व ४ यांचे नांव कब्जेदार सदरी लावण्याबाबत फेरफार नोंद क.३३२ घेण्यात आलेली आहे. परंतू प्रत्यक्षात रेकॉर्ड ऑफ राईटला वादी यांचे वडिल प्रतिवादी क.३ यांचे नांव हेतूपूरस्कर प्रतिवादी क. १ व २ यांनी तत्कालीन तलाठी यांचेशी संगनमत करून लागू दिले नाही. सदर फेरफार नोंदीचा अंमल हेतूपुरस्कर देण्यात आलेला नाही. त्यानंतर दावा कलम २ मधिल शेत मिळकत प्रतिवादी क.१ व २ यांनी परस्पर वाटणी दाखवून बेकायदेशीररित्या त्यांचे नांवे करून घेतली. सदर बेकायदेशीर व बोगस वाटणी

प्रमाणे महसूल अधिकार अभिलेखात फेरफार नोंद क.४६३ हि बेकायदेशीर व गैरकायदा प्रमाणित करण्यात आली. त्याव्दारे काळू नारायण वंजारी यांचे हिस्स्याची संपूर्ण मिळकत प्रतिवादी क.१ व २ यांनी त्यांचे नांवे करून घेतली.सदर बेकायदेशीर वाटणीप्रमाणे गट क.४७०/२अ व ४७०/२ब या मिळकती अनुक्रमे प्रतिवादी क.१ व २ यांनी त्यांचे नांवे दिनांक २ एप्रिल १९८१ रोजी केली. सदरची नोंद दिनांक २५/४/१९८१ रोजी प्रमाणित करून घेतली. सदर चुकिच्या व बेकायदेशीर नोंदीच्या आधारे सन १९८१ मध्येच प्रतिवादी क.१ व २ यांचे नांवे रेकॉर्ड ऑफ राईट ७/१२ ला लागले होते. तसेच दावा कलम २ मधिल ६ ारमिळकत देखिल प्रतिवादी क.१ ने परस्पर त्यांच्या नांवे करून घेतली. सदर मिळकती हया वादी व प्रतिवादी यांचे वडिलोपार्जित अविभक्त मिळकती आहेत.

४. सदर वादीचे वडिल यांना प्रचंड प्रमाणात दारूचे व्यसन होते. त्या गोष्टीचा गैरफायदा घेवून त्यांचा अविभक्त हिस्सा डावलण्याचा कुटील हेतूने प्रतिवादी क.१, ३ व ४ यांच्यात वडिलोपार्जित मिळकतीत सरसनिरस मानाने वाटणी झालेली नसतांना देखिल अनाधिकाराने व बेकायदेशीरित्या संगनमत करून वादींचे वडिल हे व्यसनाधिन असल्याचा गैरफायदा घेवून वडिलोपार्जित शेतमिळकतीत सुधारणा करावयाची आहे असे म्हणून बॅकेकडून कर्ज घ्यावयाचे आहे. असे खोटे सांगून त्यांची फसवणूक करून दारूच्या नशेत प्रतिवादी क. १ व २ यांनी दि.२२/११/१९८३ रोजी दावा मिळकतीपैकी गट क.४७०/२ब हया मिळकतीतील अविभक्त हिस्सा म्हणून दस्त नंबर ७९२/१९८३ अन्वये नियमविरूध्द नोंदविल्याचे दिसते. तसेच खरेदीखतात खोटे लबाडीचे व अशक्य व कायदयातील तरतुदींविरूध्द कथन केलेले आहे. वास्तविक पाहता दावा मिळकत प्रतिवादी क.१,

३ व ४ यांची अविभक्त सामाईक मालकिची तसेच सामाईक कब्जातील असल्याने व सदर मिळकतीत वाटणी व ज्याचा त्याचा हिस्सा निश्चीत झाला नसल्याने त्याचप्रमाणे प्रतिवादी क.३ यांचे स्वतंत्र कब्जाचे व हिस्स्याचे क्षेत्र नसतांना आपसात संगनमत करून अप्रामाणिकपणे व गैरअधिकाराने नियमाविरूध्द दिखाउ स्वरूपाचा खरेदीखत नोंदविले आहे. कायदयाने प्रतिवादी क. ३ चा वडिलोपार्जित मिळकतीतील त्यांच्या सरसनिरस वाटणीव्दारे येणा-या हिस्स्यात वादी क.१ व २ यांचा अविभक्त हिस्सा आहे. सबब प्रतिवादी क.१ व ३ यांना प्रतिवादी क.२ चा लाभात सदरचे खरेदीखत नोंदून देण्याचा तबदिलीचा व्यवहार करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नव्हता व नाही. तसेच सदर दस्त ज्या उता-याचा आधारे नोंदण्यात आलेले दिसते त्या उता-यावर प्रतिवादी क. १ चेच नाव आहे. जर प्रतिवादी क.१, ३ व ४ यांच्यात दावा मिळकतीबाबत फेरफार नोंद क.४६३ प्रमाणे वाटणी झालेली होती. त्याप्रमाणे शेतमिळकत गट क. ४७०/२ब हि मिळकत प्रतिवादी यांचे नांवे होती. तस सन १९८३ मध्ये सदरचे खरेदीखत करण्याचा कोणताही प्रश्न उदभवत नाही. यावरून हे स्पष्ट होते कि काळू नारायण वंजारी यांचे वारस प्रतिवादी क.१, ३ व ४ यांच्यात कायदेशीररित्या सरसनिरस मानाने वाटणी झोलेली नाही व नव्हती. अशापरिस्थितीत दिनांक २२/११/१९८३ रोजीचे प्रतिवादी क.१ व ३ यांनी प्रतिवादी क.२ यांचा लाभात करून दिलेले खरेदीखत खोटे बेकायदेशीर व चुकिचे आहे. सदरचे खरेदीखत वादी यांच्यावर बंधनकारक आहे.

सदर दावा मिळकतीत प्रतिवादी क.१, ३ व ४ यांच्यात सरसनिरसमानाने वाटणी झालेली नाही. सदर मिळकतीत प्रतिवादी क.३ यांचा

अविभाज्य हिस्सात वादी यांचा अविभक्त हिस्सा आहे व प्रतिवादी क. ३ यांच्या वडिलोपार्जित मिळकतीतील अविभाज्य हिस्स्यात वाद यांचा अविभाज्य हिस्सा आहे. सदर वादी यांनी प्रतिवादी क.१ व ३ यांना त्यांच्या वडिलोपार्जित दावा मिळकतीत सरसनिरस मानाने वाटणी करून घ्यावी व त्या वाटणीनंतर प्रतिवादी क.३ च्या वाटयास जो हि काही हिस्सा निघेल त्यात प्रतिवादी क.३ ने वादींना सरसनिरस वाटणी करून दयावी याबाबत अनेक दिवसापासून मागणी करीत आहे. प्रतिवादी क.१, २ व ४ हे वादी यांचा अविभक्त हिस्सा डावलण्याचा अप्रामाणिक हेतूने मुळात काळू नारायण वंजारी यांचे वारस म्हणून आपसात सरसनिरसमानाने वाटणी करीत नाही व प्रतिवादी क.३ चा हिस्स्यातील दावा मिळकतीत वादी यांना सरसनिरस मानाने वाटणी करून देत नाही.मागील ४ ते ५ महिन्यापासून वादी हे प्रतिवादी क.१ ते ४ यांचेकडे सरसनिरस मानाने वाटणी करणेबाबत मागणी करीत आहेत परंतू प्रतिवादी क.१ ते ४ हे हेतूपूरस्कर सरसनिरसमानाने वाटणी करून देण्यास टाळाटाळ करीत आहेत.

५. दावा मिळकतीतील वादींचा अविभक्त हिस्सा डावलण्याचा अप्रामाणिक हेतूने प्रतिवादी क२ यांनी दिनंक ३१/५/२०१४ रेजी बेकायदेशीररित्या प्रतिवादी क. ५ यांच्या लाभात खरेदीखताचा दस्त नोंदून दिला आहे. सदर मिळकतीत वादी यांचा अविभक्त हिस्सा आहे. सदर मिळकतीत वादी व प्रतिवादी यांच्यात सरसनिरस मानाने वाटणी झालेली नाही. सबब प्रतिवादी क.३ यांना सदरची मिळकत हस्तांतरीत करण्याचा कायदयाने कोणताही हक्क व अधिकार प्राप्त होत नाही. सबब प्रतिवादींनी संगनमत करून प्रतिवादी क.२ ने प्रतिवादी क.५ ला दावा मिळकतीपैकी कलम २ उपकलम अ मधिल मिळकत बेकायदेशीरित्या दस्त

क.२२८९/२०१४ व्दारे नोंदून दिलेले आहे. सदरचे खरेदीखत गैरअधिकाराचे बेकायदेशीर नियमाविरूध्द व वदींचे कायदेशीर व नैसर्गिक हक्क व अधिकार डावलणारे असून मुळातच रददबातल असल्याने ते वादीवर तसेच सदर मिळकतीवर बंधनकारक नाही असे जाहिर होवून मिळणे आवश्यक आहे. तरी वादीची मे. न्यायालयास विनंती कि वादीचा अर्ज मंजूर करून वाद मिळकती हया प्रतिवादी क.१, २ व ५ यांनी कोणासही विकी करू नये अथवा वाद मिळकतीत त्रयस्थाचे हस्तांतर निर्माण करू नये असा प्रतिवादी क.१, २ व ५ विरूध्द तूर्तातूर्त मनाई हुकूम दयावा.

६. याउलट प्रतिवादीं क.१ व २ यांचे म्हणणे कि वादीने खोटा व बनावट दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींचे कथन संक्षिप्त स्वरूपात पुढीलप्रमाणे आहे. दावा मिळकतीची प्रतिवादी क.१, ३ व ४ मध्ये फार पूर्वीच ३४ वर्षापूर्वी वाटणी झालेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क.१ व ३ यांनी सरसनिरस मानाने पुन्हा वाटणी करण्याचा प्रश्न उदभवत नाही. तशी मागणीहि वादी यांनी कधिही प्रतिवादी क.१ कडे केलेली नाही.सबब वादीने मागिल ४ ते ५ महिन्यांपासू वादीने वाटणीची मागणी केली हे कथन खोटे व लबाडिचे आहे.

दावा मिळकत गट क.४७०/२अ मध्ये वादीचा कोणताही अविभाज्य हिस्सा नव्हता व नाही. दावा मिळकत गट क.४७०/२अ हे प्रतिवादी क.२ चे स्त्रीधन म्हणून असलेने सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा प्रतिवादी क.२ हिस अधिकार होता. त्यानुसार प्रतिवादी क.३ ने सदर मिळकत क.४७०/२अ प्रतिवादी क.५ यास रजि. खरेदीने दिलेली आहे. सबब सदर खरेदीखत क.२२८९/२००४ हे

पूर्णतःच बरोबर व कायदेशीर आहे. सदर खरेदीखताविरूध्द वादीस तकार करणेचा कोणताही अधिकार/लोकस स्टॅण्डी नाही.

प्रतिवादी क.५ यास खरेदीखताने नोंदवून दिलेला व्यवहार पूर्णतः कायदेशीर आहे. प्रतिवादी क.२ हि गट क.४७०/२ब व प्रतिवादी क.१ हे घर मिळकत हस्तांतरीत करणेचा प्रश्नच उदभवत नाही. गट क.४७०/२ब व घर मिळकत हि प्रतिवादी क.१ व २ यांचे पूर्ण मालकी ताबेउपभोगातील आहे. त्या मिळकतीमध्ये वादीचा कोणताही हक्क/अधिकार किंवा हिस्सा नाही सबब वादीस मनाहुकूम मागण्याचा कोणताही हक्क नाही. वादीस प्रथमदर्शनी कोणतिही केस नाही.वादीची मागणी हि बेकायदेशीर असून खरी वस्तूस्थिती लपवून केलेली असल्याने वादीस मनाईहुकूम मागण्याचा कोणताही अधिकार नाही.

दाव्यात नमूद केलेल्या ता.२२/११/१९८३ च्या खरेदीखताची वादीस दिनांक २२/११/१९८३ पासूनच माहिती होती तसेचप्रतिवादी क. १, ३ व ४ मधिल ३४ वर्षापूर्वी झालेल्या वाटणीचीहि वादीस माहिती होती. सबब सदरचे दाव्यास कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नाही. तसेच ता.३१/५/२०१४ रोजी नोंदलेल्या खरेदीखताविषयी तकार करणेचा वादीस कोणताही अधिकार लोकस्टॅण्डी नाही. त्यामुळे सदरचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. सदरचा दावा व नि.५ चा अर्ज हा प्रथदर्शनी रदद होणेस पात्र आहे.

७. प्रतिवादीं क.४ चे कथन नि.२७ ला संक्षिप्त स्वरूपात पुढीलप्रमाणे आहे. प्रतिवादी क.४ हिने गट क. ४७०/२अ, गट क.४७०/२ब व ४७४ मधिल

तिचा हिस्सा प्रतिवादी क.१ व ३ यांचे लाभात सोडून दिलेला असल्याने प्रतिवादी क.४ हिचा दावा मिळकतीशी काहीही संबंध राहिलेला नाही. दावा मिळकती या प्रतिवादी क.१, २ व ५ यांच्या पूर्ण मालकी ताबेउपभोगातील आहेत. प्रतिवादी क. १ व ३ यांची वाटणी सुमारे बत्तीस वर्षापूर्वी झालेली आहे. हि बाब प्रतिवादी नं४ हिस माहिती आहे. प्रतिवादी क.१ व ३ यांच्या मिळकतीमध्ये आता प्रतिवादी क.४ हिचा काहीएक हक्क अगर हितसंबंध राहिलेला नाही. सबब वादीचा अर्ज रदद करण्यात यावा.

८. प्रतिवादीं क.५ चे कथन नि.३७ ला संक्षिप्त स्वरूपात पुढीलप्रमाणे आहे. प्रतिवादी क.२ व ३ यांनी दाव्यातील गट क. ४७०/२अ, क्षेत्र १ हेक्टर- ६२, पो.ख. ०.२० आर, शेत जमिन विकीस काढली. सदर शेतजमिन प्रतिवादी क. ५ याने खरेदी घेणेची संमती दिली.सदर शेतजमिनीची विकीची किंमत चार चौघांसमक्ष रक्कम रूपये ८,९२,०००/- ठरली. रक्कमेचा भरणा चार चौघांसमक्ष दिल्यानंतर प्रतिवादी क.२ यांनी प्रतिवादी क.५ चे लाभात खरेदीखत लिहून ता. ३१/५/२०१४ रोजी नोंदवून दिले आहे. शेतावर जावून प्रत्यक्ष चार हि बाजूस फिरून चार चौघांसमक्ष कब्जा दिला. तेंव्हापासून प्रतिवादी क.५ हा मालक म्हणून खेड करीत आहे. वस्तूस्थिती कि गट क. ४७०/२अ, हि मिळकत प्रतिवादी क.२ श्रीमती लिलाबाई दोधू वंजारी यांची 'स्त्रीधन' आहे. सदर मिळकतीची विल्हेवाट करणेचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. त्या संदर्भात वादीस या स्वरूपात दावा आणता येत नाही. प्रतिवादी क.५ हा प्रामाणिक खरेदीदार विना नोटीस आहे. सबब वादीची मागणी गैरकायदा आहे. वदीच्या हक्कावर गदा येणेचा प्रश्न उदभवत नाही.

सबब वादींचा सदरचा खोटा व बेकायदेशीर दावा प्रथम दर्शनीच फेटाळण्यास पात्र आहे. अशापरिस्थिती प्रतिवादीं विरूध्द मनाईहुकूम दिल्यास त्याचे अपरिमीत नुकसान होईल म्हणून वादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

९- वादी यांनी त्यांचे युक्तिवादाचे पृष्ठयर्थ नि.३ सोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत. मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे शिवारातील शेतजमीन गट क. ४७०/२अ, चा सन २००५-६ ते सन २०१३-१४ च्या ७/१२ उता-याची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता.साक्री. जि.धुळे शिवारातील सन २००५-६ ते सन २०१३-१४ च्या शेतजमीन गट क.४७०/२ब, चा ७/१२ उता-याची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता. साक्री..धुळे शिवारातील शेतजमीन गट क.४७०/२अ, चा सन १९८४-८५ ते सन १९९७-९८ च्या ७/१२ उता-याची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता.साक्री.जि.धुळे शिवारातील सन १९८४-८५ ते सन १९९७-९८ च्या शेतजमीन गट क.४७०/२ब, चा ७/१२ उता-याची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे शिवारातील शेतजमीन गट क.४७०/२ब, चा सन १९८१-८२ते सन १९९४-९५ च्या ७/१२ उता-याची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे शिवारातील शेतजमीन गट क.४७०/२ब, चा सन १९८१-८२ते सन १९९४-९५ च्या ७/१२ उता-याची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता.साक्री. जि.धुळे शिवारातील शेतजमीन गट क.४७०/२ब, चा सन १९८१-८२ते सन १९९४-९५ च्या ७/१२ उता-याची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे शिवारातील शेतजमीचे फेरफार नोंद क. ३३२ ची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे शिवारातील शेतजमीचे फेरफार नोंद क. ५८१ ची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे शिवारातील शेतजमीचे फेरफार नोंद क.४६३

ची सत्यप्रत, मौजे शेणपूर ता. साक्री. जि. धुळे शिवारातील ग्रामपंचायत घर क. ३०३ चा उतारा, दि. २२ नोव्हेंबर १९८३ ची खरेदी खताची नक्कल, दि. ३१ मे २०१४ ची खरेदी खताची नक्कल इ. कागदपत्र वादींनी दाखल केले आहेत.

याउलट प्रतिवादी क.७ यांनी त्यांचे युक्तिवादाचे पृष्ठयर्थ नि.३९ सोबत स्पेशल मुखत्यार पत्र दि.२१/७/२०१४ इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

१०. न्यायालयाचे विचारार्थ उपस्थित झालेले मुदद् व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे.

| | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींना प्रथमदर्शनी केस आहे काय ? | ... नाही |
| २ | न्यायाचा समतोल वादींचे बाजुने आहे काय? | ... नाही |
| ३ | तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादींचे अपरिमित नूकसान होईल काय ? | ... नाही |
| ४ | काय आदेश पारित करण्यात येत आहे? | अर्ज नामंजूर |

## निष्कर्षांसाठी कारणमिमांसा

५. वादींचे सुविद्य विधीज्ञ श्री. एम.बी.साळुंखे व प्रतिवादीचे सुविद्य विधीज्ञ श्री.अे.आर.सगर यांचा युक्तिवाद ऐकला. वादी व प्रतिवादींनी दस्तऐवज यादी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

<u>मुददे क.१ ते ३ साठी :</u>

११. वादींचे असे कथन कि, प्रस्तुतची दावा मिळकत हि त्यांची मालकी व कब्जेउपभोगातील मिळकत आहे. वादीने त्याच्या कथनाच्या पृष्ठयर्थ मे. न्यायालयात दावा मिळकतीचे ७/१२ उतारे, फेरफार नोंदींचे उतारे इत्यादी कागदपत्र दाखल केलेले आहेत.

१२. वादी व प्रतिवादींच्या सुविदय विधिज्ञांचा दिघ्र युक्तिवाद ऐकला. वादी व प्रतिवादीं यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी प्रथमदर्शनी कुठलिही केस सिध्द केली नाही. यउलट प्रतिवादी यांनी शेत जमिन नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतल्याचे कागदपत्र दाखल केली असल्यामुळे औचित्याचे समतोल प्रतिवादीच्या बाजूने आहे. प्रथमदर्शनी केस प्रतिवादीचे बाजूने आहे असे सिध्द होते. याउलट मनाईहुकूमाचा आदेश प्रतिवादींविरूध्द झाल्यास प्रातिवादींचे अपरिमीत नुकसान होईल. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच मालकाविरूध्द जमिन विकू नये असा आदेश आजच्या तारखेला देता येणार नाही. वादींचा खरोखर हिस्सा अगर हक्क असल्यास वादीने तो पुरावा देवून सिध्द केल्यानंतरहि प्रतिवादींनी जर दाव्याचे दरम्यान वाद जमिनी तबदिल केल्यास न्यायनिर्णय विकत घेणा-यावर बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे प्रतिवादींवर आज रोजी मनाईहुकूम देणे प्रतिवादींच्या मालकी हक्कांना बाध येणार आहे. प्रतिवादीने असा युक्तिवाद केला कि वादीला प्रतिवादी विरूध्द रास्त अनुतोष/रास्त दाद (equitable relief) मागण्याचा अधिकार नाही. कारण वादी स्वतः स्वच्छ हाताने आलेला नाही. सबब वादीस कोणताही प्रतिवादी विरूध्द रास्त अनुतोष/रास्त दाद (equitable relief) मागण्याचा अधिकार नाही.

सबब वादीची प्रतिवादीविरूध्द कोणतिही प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येत नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

१३- उपरोक्त कारणास्तव मुददे् क.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविलेले आहेत व मुदद्ा क.४ चे निष्कर्षार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१- वादीचा नि.क.५ चा तूर्तातूर्त मनाईहुकूमाचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२ अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

दिनांक ८/१२/२०१५

( हेमंत एस. अहिवळे. )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, साक्री
ता. साक्री, जि. धुळे

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणीत करीतो किं, सदर पी. डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव - एस. के. बिरारीस

न्यायालयाचे नांव - दिवाणी न्यायालय (क. स्तर) व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, साक्री, ता. साक्री जि. धुळे

पी. डी. एफ. फाईल अपलोड केल्याचा दिनांक - दिनांक ९/१२/२०१४.

सही/- ( एस्. के. बिरारीस )
लघूलेखक